ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, रत्नागिरी.
कार्यकारी अभियंता
अधिक्षक
दाखल तारीख 14 JUL 1999
कार्या. सन क्र. MAH-2
आवक क्रमांक 8206

रत्नागिरी जिल्हा परिषद
१) दाखल तारीख 12 JUL 1999
२) विभाग/शाखा
३) आवक क्र.
उप मु. का. अ. / मु. का. अ.

**रोजगार हमी योजनेखाली जवाहर विहिरी कार्यक्रम - १९९९-२००० चा लक्ष्यांक.**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय,क्रमांक:जविका-१२९८/प्र.१०४/रोहयो-१०.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनाक: 1 जुलै, १९९९.

**वाचा:-**

(१) शा.नि.,नि.,वि.क्र.रोहयो-२१९८/प्र.१२८/रोहयो-६,दि.२४ डिसेंबर,१९९१.
(२) शा.नि.,नि.,वि.,क्र.रोहयो-१०९३/प्र.१४०/रोहया-६,दि.३१ मे,१९९३.
(३) शा.नि.,नि.,वि.,क्र.रोहयो-२०९४/प्र.५४/रोहयो-६,दि.७ सप्टेंबर,१९९४
(४) शा.नि.,नि.वि.,क्र.जविका-१०९५/प्र.२९:रोहयो-१०,दि.२९ मे,१९९५.
(५) शासन पत्र,नि.वि.,क्र.जविका-१०९५/प्र.२९/रोहयो-१०,दि.२४.१.१९९६.
(६) शा.नि.,नि.वि.,क्र.जविक-१०९४/प्र,७४/रोहयो-१०दि.२८ मे,१९९६.
(७) शा.नि.,ग्रा.वि.व ज.सं.वि.क्र.विहिर-१०९६/प्र.२८/जल-१७,दि.२८.१०.९६

**प्रस्तावना:-**

राज्यात अधून मधून येणा-या दुष्काळ सदृश्य परिस्थितीला आळा घालण्यासाठी पावसाचे पाणी अडविणे व जिरविणे, त्याचप्रमाणे या पाण्याचा उपसा करुन सिंचन करणे, व अधिकाधिक जमिन लागवडीखाली आणणे हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून अल्पभूधारक शेतक-यांच्या जमिनीवर मोठया प्रमाणावर विहिरी घेण्याचा कार्यक्रम राज्य शासनाने २१ डिसेंबर,१९९१ च्या आदेशान्वये हाती घेतला आहे. पावसाच्या पाण्यावरील शेतीवर अवलंबून असलेल्या कोरडवाहू शेतक-यांकरिता ही योजना राबविली जाते. रोजगार हमी योजने अंतर्गत जवाहर विहिर कार्यक्रमासाठी सन १९९९-२००० पासून पुढील ५ वर्षांकरिता १ लाख विहिरींचे उद्दिष्ट शासनाने मंजूर केले आहे. सबब या विषयी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :

**शासन निर्णय:-**

रोजगार हमी योजने अंतर्गतचा जवाहर विहिर कार्यक्रम सन १९९९-२००० या वर्षीही राबविण्यास शासन मान्यता देत आहे. या कार्यक्रमाची अंमलबजावणी पुढे दर्शविल्याप्रमाणे करण्यात यावी.

(१) **लक्षांक:-** सन १९९९-२००० या वर्षाकरिता जवाहर विहिर कार्यक्रमांतर्गत 29158 विहिरींचा लक्षांक या आदेशाद्वारे निश्चित करण्यात येत आहे. जिल्हानिहाय लक्षांक परिशिष्ट अ मध्ये दर्शविला आहे.

शासनाने निर्धारित केलेल्या लक्षांकानुसारच लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय उद्दिष्टापेक्षा जास्त जवाहर विहिरी मंजूर करु नयेत. या विषयी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी.

...२/-

(२) **योजनेचे उद्दिष्ट:-** या योजनेचे उद्दिष्ट लाभार्थ्यास सिंचन विहिरी पुरविण्याचे आहे. ही योजना फक्त विहिरींची खोदाई व स्थापत्य बांधकाम यापुरतीच मर्यादित आहे. या योजनेत नलिका विहिरी आणि कुपनलिका विहिरी तसेच पंपिंग सेट, विद्युत पंप, डिझेल पंप सारख्या इतर उपसा सिंचनासारख्या साधनांचा अंतर्भाव नाही. पावसाच्या पाण्यावरील शेतवर अवलंबून असलेल्या कोरडवाहू अल्पभूधारक शेतक-यांसाठी प्रामुख्याने ही योजना राबविली जाते.

(३) **लक्षित लाभार्थी:-** या योजनेखाली निवड करावयाचे लक्षित लाभार्थी खालीलप्रमाणे आहेत:-

(अ) ३० टक्के मागासवर्गीय अल्पभूधारक (५ एकर पर्यन्तचे जमीनधारक)
(ब) ३० टक्के मागासवर्गीयेतर अल्पभूधारक (५ एकर पर्यंतचे जमीनधारक)
(क) ४० टक्के लाभार्थी नाबार्डच्या व्याख्येप्रमाणे पावसाच्या पाण्यावरील शेतीवर अवलंबून असलेले / कोरडवाहू अल्पभूधारक.

ज्या लाभार्थ्यांच्या शेतात पूर्वीपासून विहिर असेल त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. लाभार्थ्यांकडे किमान ०.६० हेक्टर जमीन असावयास हवी, त्याहून कमी क्षेत्र असलेल्या लाभार्थ्यांस विहिर मंजूर करु नये. मात्र २, ३ लाभार्थ्यांनी, त्यांची जमीन सलग असल्यास, सामुदायिक विहिरींची मागणी केली तर त्याचा विचार करावा. लाभार्थी निवडतांना महिला लाभार्थ्यांस प्राधान्य दिले जावे.

(४) **विहिरींची जागा:-** ज्या भागात नेहमी पाण्याची टंचाई असते अशा भागात विहिरी प्राथम्याने मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून विहिरींची कामे घेताना पुढील प्राथम्य क्रमानुसार घेण्यात यावीत.

(अ) नेहमीच पाण्याची टंचाई परिस्थिती उद्‌भवते असा भाग.
(ब) भूजल सर्वेक्षण यंत्रणेने पाणवहाळ म्हणून जाहीर केलेले क्षेत्र.
(क) ज्या भागात पाझर तलाव बांधून पूर्ण झाले आहेत,अशा पाझर तलावाखाली नाल्याच्या व दोन्ही किना-यांच्या बाजूचे क्षेत्र.
(ड) नदी व मोठया नाल्याच्या दोन्ही किना-याच्या बाजूचे ०.७५ कि.मी.रुंदीचे क्षेत्र.
(इ) पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात पाणथळ क्षेत्र निर्माण होण्याचा धोका दिसतो असे क्षेत्र.
(ई) पाटबंधारे विभागाने कमांड एरियाखाली जाहिर केलेले परंतु पुढील पाच वर्षात पाणी पोहोचणार नाही असे क्षेत्र.

(५) **भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र:-** विहिरींचा कार्यक्रम मोठया प्रमाणात घ्यावयाचा असल्यामुळे यासाठी काही विहित शर्तींचे शिथिलीकरण करणे आवश्यक झाले आहे. विहिरी खोदण्यासाठी भूजल सर्वेक्षणव विकास यंत्रणेचे प्रमाणपत्र आवश्यक असते. परंतु ज्या ठिकाणी पाण्याच्या उपलब्धतेची निश्चिती आहे त्या ठिकाणी अशा प्रमाणपत्राचा आग्रह धरल्यामुळे त्यामध्ये बराच कालापव्यय होतो आणि कार्यक्रमाला बाधा येते. याचा विचार करुन वरील ब,क, ड, इ, ई या क्षेत्रात विहिरी बांधण्यासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या प्रमाणपत्राची अट काढून टाकण्यात आली आहे. तसेच (अ) मधील क्षेत्र जर ब, क, ड, इ व ई मध्ये येत असेल तर तेथे देखील या प्रमाणपत्राची आवश्यता राहणार नाही.

४. ज्या तालुक्यात तालुका समन्वय समिती गठीत झालेली नाही त्या ठिकाणी तालुका समन्वय समितीने अध्यक्ष (मा.आमदार),समितीचे सदस्य सचिव व सदस्य म्हणजेच गट विकास अधिकारी व तहसीलदार यांच्या संयुक्त सहीने लाभार्थ्यांची शिफारस करावी. अशीं यादी व लाभार्थ्यांची पूर्ण यादी पालकमंत्र्यांच्या मान्यतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी पाठवावी.

५. पालकमंत्र्यांना अशा प्रकारे गट विकास अधिका-यांची प्राथमिक यादी व तालुका समन्वय समितीने वा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी शिफारस केलेली अशा दोन यादया प्राप्त होतील. पालकमंत्री यांनी त्यांना प्राप्त झालेल्या यादीतून लाभार्थ्यांची अंतिम निवड करावयाची आहे. लाभार्थ्यांच्या निवडीचे अंतिम अधिकार पालकमंत्र्यांना देण्यात आले आहेत. म्हणजेच लाभार्थी निवडीची अंतिम प्रक्रिया पालकमंत्री पूर्ण करतील.

६. पालकमंत्र्यांनी मंजूर केलेली यादी अंतिम असेल. अशा प्रकारे लाभार्थ्यांची निवड झाल्यावर याविषयीचे प्रशासकीय मंजूरीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी द्यावेत.

(९) **लाभार्थ्यांची जबाबदारी:-** जवाहर विहिर मंजूर झाल्यानंतर त्याचे प्रत्यक्ष खोदकाम व बांधकाम संबंधित लाभार्थ्यावर सोपविण्या यावे. लाभार्थ्याने ते काम स्वतः आपल्या घरातील माणसे व स्थानिक मजूर लावून करावे. त्याचप्रमाणे विहिरीच्या कामामध्ये तज्ञ व अनुभवी असलेल्या एखाद्या स्थानिक व्यक्तीस मुकादमाच्या / कुशल कामगाराच्या स्वरुपात नेमून विहिरीचे काम पूर्ण करण्यास हरकत नाही. परंतु कोणत्याही परिस्थितीत हे काम ठेकेदारामर्फत पूर्ण करण्यात येऊ नये. विहिरीवर काम करणा-या अकुशल-कुशल मजूरांना विहित दराने मजूरी देण्यात यावी. हे काम करीत असताना हजेरीपत्रक ठेवण्याची आवश्यकता नाही. एखादा लाभधारक जर अपंग असेल तर व त्यांना विहिरीचे काम स्वतःहून करवून घेण्याची कुवत नसेल तर अशा अपवादात्मक परिस्थितीतच ते काम विभाग वा ग्रामपंचायतीमार्फत करुन देण्यात यावे.

(१०) **लाभार्थी निवडीची मुदत:-** सदरहू कार्यक्रमांतर्गत निश्चित केलेल्या लक्षांकानुसार लाभार्थ्यांची निवडीची प्रक्रिया ३१ डिसेंबर ९९ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

(११) **तांत्रिक मंजूरी:-** जिल्हपरिषदेचे लघूपाटबंधारे विभागाचे उप अभियंता व त्यांच्या तांत्रिक कर्मचा-यांच्या मदतीने ज्या लाभार्थ्यांची अंतिम निवड झाली आहे, त्यांचे गांवानेहाय व गटनिहाय प्रकल्प प्रस्ताव गटविकास अधिकारी यांनी तयार करुन घ्यावेत. प्रस्तुत प्रकल्प प्रस्ताव संबंधित तांत्रिक अधिकारी यांनी तयार केलेल्या मॉडेल आराखडा व अंदाजपत्रकानुसार असावेत. या अंदाजपत्रकात विहिरींची जागा, लाभार्थ्याचे नांव, अंदाजित खर्च, कुशल/ अकुशल मजूरी, सामुग्रीची किंमत,इत्यादी सर्व बाब दर्शविलेल्या असाव्यात. केंद्र शासनाच्या दशलक्ष विहिर कार्यक्रमासाठी निश्चित केलेल्या आर्थिक व तांत्रिक निकषांनुसार ही अंदाजपत्रके तयार करण्यात यावीत.

(१२) **प्रकल्पांना मंजूरी :-** जवाहर विहिरीचा कार्यक्रम राबविण्याची पूर्ण जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांचेवर आहे. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड करण्यापासून ते प्रकल्पाची अंदाजपत्रके तयार करुन घेण्यापर्यंतची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांचेवर सोपविण्यात आलेली आहे. त्यामुळे विहिरीच्या प्रकल्पाना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांना देण्यात येत आहेत.

..५

(६) **महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे प्रमाणपत्र:-** शेतकरी विहिरीच्या पाण्याचा उपयोग सिंचनासाठी करणार असल्यामुळे पुढे मागे विद्युत पंप बसविण्याच्या दृष्टीकोनातून विद्युत पुरवठा करण्यात येईल, अशा प्रकारचे महाराष्ट्र विद्युत मंडळाचे प्रमाणपत्र घेण्यात येते. विहिर विद्युत लाईनपासून दूर असल्यास असे प्रमाणपत्र दिले जात नाही. परंतु शेतकरी डिझेल पंप अथवा इतर पारंपारिक पध्दतीने पाणी उपसू शकत असल्यामुळे या कार्यक्रमाखाली विहिर खोदतांना महाराष्ट्र विद्युत मंडळाचे विद्युत पुरवठया बदलचे पूर्व प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. परंतु शेतक-यास याची जाणीव देवून विद्युत पुरवठयाची निश्चिती सांगत येत नसल्याचे स्पष्ट करावे व त्याची अनुमती असल्यास विहिरीचे काम मंजूर करावे.

(७) **तालुकावार लक्षांकाची निश्चिती:-** मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी शासनाचे प्रत्येक जिल्हयाकरिता विहित केलेला जवाहर विहिरींचा लक्षांक विचारात घेऊन खालीलप्रमाणे तालुकावार लक्षांक निश्चित करावा.

(अ) २५ टक्के लक्षांक तालुक्यातील पिकाखाली असलेल्या एकूण क्षेत्राच्या प्रमाणात.
(ब) २५ टक्के लक्षांक तालुक्यातील मागासवर्गीय अल्पभूधारकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात.
(क) २५ टक्के लक्षांक मागासवर्गीयेतर अल्पभूधारकांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात.
(ड) २५ टक्के लक्षांक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (जी.एस.डी.ए.) च्या अहवालानुसार तालुक्यात शक्य असलेल्या एकूण विहिरींच्या संख्येच्या प्रमाणात.

कार्यकारी अभियंता,जिल्हापरिषद (लघुपाटबंधारे),जिल्हा भूजलसर्वेक्षण विकास यंत्रणेचे जिल्हा प्रमुख, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, इत्यादी संबंधित अधिका-यांच्या मदतीने हा लक्षांक निश्चित करण्यात यावा.

लक्षांकाचे तालुकानिहाय वाटप करताना शक्यतो समतोल साधला जाईल याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी घ्यावी.

(८) **लाभार्थी निवडीची पध्दत:-** या कार्यक्रमांतर्गत लाभ घेऊ इच्छिणा-या लाभार्थ्यांचे अर्ज ग्राम सेवकांमार्फत गट विकास अधिका-यांनी प्राप्त करुन घ्यावे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करावी. या यादीत लाभार्थ्यांचे नांव,गावाचे नांव,एकूण ज़मीन, वार्षिक उत्पन्न, मागासवर्गीय / अमागासवर्गीय आहे, इलेक्ट्रीक पोलचे अंतर व नियमाप्रमाणे पात्र का अपात्र आहे,इत्यादीचा समावेश असावा. गट विकास अधिका-यांनी तयार केलेल्या या प्राथमिक यादीची आगाऊ प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी प्रथमतः पालकमंत्री यांचेकडे पाठवावी.

२. गट विकास अधिक-यांनी त्यांचेकडे प्राप्त झालेले लाभार्थ्यांचे अर्ज यादीसह तालुका समन्वय समिती समोर सादर करावेत. तालुक्याला ठरवून दिलेल्या लक्षाकांप्रमाणे तालुका समन्वय समितीने पात्र लाभार्थ्यांच्या निवडीबद्दल योग्य त्या शिफारशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांना सादर कराव्यात. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी तालुका समन्वय समितीने केलेल्या शिफारशींचे प्रस्ताव यादीसह पालकमंत्र्यांना पाठवावेत.

३. जर तालुका समन्वय समितीने आपल्या प्रथम बैठकीत याविषयी निर्णय घेतला नसेल तर कालापव्यय टाळण्यासाठी सदस्य सचिवांनी ही यादी पुढील कार्यवाहीकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांचेकडे पाठवावी. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी ही यादी तपासून लाभार्थ्यांच्या निवडीबद्दल शिफारस करुन तो प्रस्ताव देखील पालकमंत्र्याना पाठवावा...४

गट विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांच्या विहिरीच्या प्रकल्पाचे अंदाजपत्रक जिल्हा-
परिषदेच्या तांत्रिक अधिका-यांकडून बनवून घेतल्यावर ही अंदाजपत्रके मुख्य कार्यकारी
अधिकारी,जिल्हा परिषद यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करतील. मुख्य कार्यकारी
अधिकारी,जिल्हापरिषद हे शासनाने निश्चित केलेल्या विहिरींचे तांत्रिक व आर्थिक निकषानुसार
अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देतील. सुधारित अंदाजपत्रकास (खर्चाच्या मापदंडापेक्षा २०
टक्के पर्यंतचा अधिक खर्च असलेल्या अंदाजपत्रकास)मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद
प्रशासकीय मान्यता देतील. 20% पेक्षा

सुधारित अंदाजपत्रकापेक्षा जर विहिरीची किंमत शासनाने ठरवून दिलेल्या निकषांपेक्षा, जास्त
होत असेल तर त्या २० टक्क्याहून अधिक किंमतीच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता
देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना देण्यात येत आहेत.

(१३) <u>खर्चाचे निकष</u>:- ग्राम विकास व जलसंधारण विभागाने केंद्र शासनाच्या दशलक्ष
विहिर कार्यक्रमासाठी विहिरीच्या खर्चाचे जे निकष दि.२८ ऑक्टोबर,१९९६ च्या क्र.विहिर-१०९६/प्र.
२८/जल-१७, आदेशानुसार निश्चित केले आहेत, त्या निकषानुसारच रोजगार हमी योजनेंतर्गतच्या
जवाहर विहिरी घेण्यात याव्यात.

(१४) <u>अकुशल:कुशल प्रमाण</u>:- जवाहर विहिरी कार्यक्रमासाठी अकुशल:कुशल खर्चाचे
प्रमाण ५०:५० राहील.

(१५) <u>निधी:-</u> जवाहर विहिरी हा कार्यक्रम रोजगार हमी योजनेचा एक भाग असल्याने
निधी उपलब्ध करुन देण्यासंबंधी रोजगार हमी योजने अंतर्गत जे नियम व कार्यपध्दती आहेत ते
नियम याही कार्यक्रमास लागू राहतील. या कार्यक्रमासाठी दर तिमाही वा सहामाहीसाठी
लागणा-या निधीची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी नियोजन विभागाकडे व
जिल्हाधिकरी यांचेकडे करावी. जिल्हाधिका-यांना शासनाने या योजने अंतर्गत निधी/पतमर्यादा
उपलब्ध करुन दिल्यावर जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांना
त्यांच्या मागणीपत्राची छाननी करुन निधी उपलब्ध करुन द्यावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी या कार्यक्रमासाठी पुढील तिमाहीसाठी
लागणा-या पतमर्यादेची आवश्यक माहिती जिल्हाधिकारी यांना आगावू कळवावी. ही माहिती
कळविताना मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी खर्चाचे अद्यावत आकडेही जिल्हाधिकारी
यांना न चुकता कळवावेत.

(१६) <u>अनुदान</u>:- विहिरी मंजूर केल्यावर विहिरीच्या अंदाजपत्रकाच्या १० टक्के रक्कम
लाभार्थ्याला काम सुरु करतेवेळी आगाऊ देण्यात यावी व ज्यावेळी लाभार्थीने केलेल्या कामाच्या
मोजमापानुसार लाभार्थीला देयक (पेमेंट)अदा केले जाईल त्यावेळी त्या देयकाच्या रक्कमेच्या १५
टक्के रक्कम,आगाऊ रक्कम वसूल होईपर्यंत, वळती करुन घ्यावी. <u>अशारितीने लाभार्थीला त्यांनी
केलेल्या कामाचे शेवटचे देयक देण्यात येईल त्यावेळेला आगाऊ दिलेली संपूर्ण रक्कम त्यामधून
वळती होणे अवश्यक आहे.</u> आगाऊ द्यावयाची रक्कम ही मुख्य कार्यकारी अधिका-याने त्यांना या
कार्यक्रमासाठी देण्यात येणा-या पतमर्यादेतून देण्यात यावी.

...६

(१७) विहिरी पूर्ण करण्याचा कालावधी:- मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी जवाहर विहिरींच्या प्रशासकीय आदेशात लाभार्थ्यास काम सुरु करण्याकरिता कार्यारंभ आदेश देण्यात यावेत व या आदेशाची प्रत लाभार्थ्यास द्यावी.

अशा प्रकारे काम सुरु करण्याचे आदेश दिलेल्या तारखेपासून दोन महिन्यात लाभार्थ्याने विहिरीचे काम सुरु करावे व तद्नंतर पुढील १२ महिन्यात म्हणजेच अशाप्रकारे एकूण १४ महिन्यात काम पूर्ण करावे. जर या विहित कालावधीत लाभार्थ्याने काम पूर्ण केले नाही तर लाभार्थ्यास दिलेल्या अनुदानाची रक्कम वसूल करण्यात येईल. याविषयी लाभार्थ्यास काम सुरु करण्यापूर्वीच पूर्ण कल्पना देण्यात यावी,व तसा आवश्यक करारनामा करण्यात यावा.

(१८) वसुली:- लाभार्थ्याने वरीलप्रमाणे विहित कालमर्यादेत काम पूर्ण न केल्यास त्याला दिलेली अनुदानाची रक्कम महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात यावी.

(१९) पतमर्यादा मागणी:- मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद यांनी शासनाने विहित केलेल्या सोबतच्या प्रपत्र ब विवरणपत्रानुसार दर तिमाहीसाठी नियोजन विभागाकडे मागणीपत्र पाठवावे. हे मागणीपत्र तिमाहीच्या सुरुवातीच्या पंधरवड्यात पाठविण्याची व्यवस्था करावी व त्याची प्रत जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना पाठवावी.

(२०) मासिक प्रगती अहवाल:- या योजने अंतर्गत शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या, विनियोगाची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र क मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी या विभागास पाठवून त्याची प्रत जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना पाठवावी. हा मासिक प्रगतीचा अहवाल महिना संपल्यावर 2 आठवड्याच्या आत या विभागास पाठवावा.

(२१) सेवा अधिग्रहीत करणे :- विहिरींचा कार्यक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी, व जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यामार्फत राबवावयाचा असल्यामुळे त्याकरिता महाराष्ट्र जिल्हा परिषद,पंचायत समिती अधिनियम,१९६१ कलम २६१ (२) प्रमाणे विहिरींची कामे रोजगार हमी योजनेखाली राबविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद व इतर सर्व संबंधित जिल्हापरिषदेच्या कर्मचा-याच्या सेवा महाराष्ट्र शासनाकडे याद्वारे अधिग्रहीत करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ज्योती पोतदार

(ज्योती पोतदार)

अवर सचिव, नियोजन विभाग.

प्रति,

1. सर्व मंत्री, यांचे खाजगी सचिव,
2. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
3. सचिव (ग्राम विकास व जलसंधारण विभाग),
4. सर्व विभागीय आयुक्त,
5. सर्व जिल्हाधिकारी,
6. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
7. उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती (40 प्रती),
8. संचालक, भूजल सर्वेक्षण यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
9. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे,
10. सर्व विशेष कार्य अधिकारी (रोहयो)विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
11. नियोजन विभागातील अवर सचिव व कक्ष अधिकारी, (रोहयो प्रभाग),
12. निवड नस्ती.